**शिक्षकांसाठी सूचना आणि उत्तरसूची** **गणित (मराठी माध्यम) : इ. ३ री**

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे-३०.**

**'STARS' प्रकल्पांतर्गत**

# पायाभूत चाचणी २०२३-२४

## इयत्ता - तिसरी : विषय - गणित

## शिक्षकांसाठी सूचना, प्रात्यक्षिक/तोंडी प्रश्न आणि उत्तरसूची

---

**भूमिका व दृष्टिकोनातील बदल :**

राज्यस्तरावरून 'STARS' प्रकल्पांतर्गत २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात पायाभूत चाचणी, संकलित चाचणी १ व संकलित चाचणी २ अशा तीन चाचण्या घेण्याचे नियोजन करण्यात आले आहे. इयत्ता तिसरी ते आठवी पर्यंतच्या प्रत्येक विद्यार्थ्याने वयोगटानुरूप अपेक्षित अध्ययन संपादणूक प्राप्त केली आहे किंवा नाही, याची तपासणी या चाचण्यांद्वारे करता येईल.

या चाचण्यांद्वारे विद्यार्थी संपादणुकीचे सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन करून गुणवत्ता समृद्धीसाठी आवश्यक उपाययोजना करणे तसेच शाळाधारित मूल्यांकन प्रक्रियेचे बळकटीकरण करणे हा उद्देश आहे.

यानुसार राज्यस्तरावरून २०२३-२४ या शैक्षणिक वर्षात इयत्तानिहाय अध्ययन निष्पत्ती आधारित इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांची पायाभूत चाचणी घेण्यात येत आहे. सदर चाचणीचा मुख्य उद्देश, विद्यार्थ्यांनी आधीच्या इयत्तांमधील अध्ययन निष्पत्ती किती प्रमाणात प्राप्त केलेल्या आहेत, हे शिक्षकांनी लक्षात घेऊन गरजेनुरूप कृती-कार्यक्रमाची अंमलबजावणी करणे हा आहे.

**चाचणीचे स्वरूप :**

- पायाभूत चाचणी ही अध्ययन निष्पत्तीवर आधारित असून ती इयत्ता तिसरी ते आठवीच्या विद्यार्थ्यांसाठी प्रात्यक्षिक, तोंडी व लेखी स्वरूपाची आहे.
- पायाभूत चाचणी विकसित करताना मागील इयत्तांच्या विषयनिहाय अध्ययन निष्पत्ती/क्षमता विचारात घेतल्या आहेत.

| इयत्ता | तोंडी | प्रात्यक्षिक | लेखी | एकूण | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|
| तिसरी | 10 | | 30 | **40** | इयत्ता दुसरी |
| चौथी | 10 | | 30 | **40** | इयत्ता तिसरी |
| पाचवी | 10 | | 40 | **50** | इयत्ता चौथी |

| इयत्ता | तोंडी | प्रात्यक्षिक | लेखी | एकूण | अध्ययन निष्पत्ती |
|---|---|---|---|---|---|
| सहावी | 5 | 5 | 40 | **50** | इयत्ता पाचवी |
| सातवी | 5 | 5 | 50 | **60** | इयत्ता पाचवी व इयत्ता सहावी |
| आठवी | 5 | 5 | 50 | **60** | इयत्ता पाचवी, इयत्ता सातवी |

**चाचणी नियोजनकरिता सूचना :**

- पायाभूत चाचणीचे पूर्वनियोजन, प्रत्यक्ष चाचणी घेणे आणि माहितीचे संकलन अशा तीन टप्प्यांचे नियोजन शिक्षकांनी इयत्तानिहाय व विषयनिहाय करावे.
- प्रात्यक्षिक/तोंडी परीक्षेसाठी लागणारे साहित्य शिक्षकांनी चाचणी सुरू करण्यापूर्वी तयार ठेवावे.
- विद्यार्थी संख्येनुसार वेळेचे नियोजन करावे.
- प्रात्यक्षिक/तोंडी व लेखी परीक्षेसाठी विद्यार्थ्यांना पुरेसा वेळ द्यावा.
- विद्यार्थ्यांना प्रश्नाचे आकलन न झाल्यास शिक्षकांनी त्यांना प्रश्न समजण्यासाठी साहाय्य करावे; मात्र उत्तराचा संकेत देऊ नये.
- संबंधित वर्गाच्या गणित विषय शिकविणाऱ्या शिक्षकांनीच ही चाचणी विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्यावी.
- चाचणी तपासताना प्रश्नांचे गुण पूर्णांकात द्यावे. अर्धा गुण देऊ नये.
- प्रात्यक्षिक व तोंडी परीक्षेची उत्तरे व कृतीसाठी वेगळा कागद वापरून त्यात विद्यार्थ्यांना आपले प्रतिसाद नोंदवण्यास सांगावे.
- इयत्ता ३ री ते ५ वी साठी M/P1 ते M/P10 या प्रश्नांच्या समोरील चौकटीत शिक्षकांनी विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादानुसार [0] किंवा [1] अशाप्रकारे गुण द्यावेत व एकूण १० पैकी प्राप्त गुण लेखी परीक्षेसाठी दिलेल्या तक्त्यात नोंदवायचे आहेत.
- इयत्ता सहावी ते आठवीसाठी M1 ते M5 हे तोंडी प्रश्न आहेत, P1 ते P5 हे प्रात्यक्षिक प्रश्न आहेत.

**चाचणीनंतर :**

१) चाचणीची उत्तरपत्रिका तपासल्यानंतर विद्यार्थ्यांच्या गुणांची नोंद गुणनोंदणी तक्त्यात करावी.

२) गुणनोंदणी तक्त्यातील गुणांचे विश्लेषण करावे.

३) ज्या क्षेत्रांत/क्षमता/अध्ययन निष्पत्तीमध्ये विद्यार्थी मागे पडलेले आढळतील त्या विद्यार्थ्यांसाठी गरजेनुसार कृती कार्यक्रमांची निर्मिती व अंमलबजावणी करावी.

४) ज्या अध्ययन निष्पत्तीमधील विद्यार्थ्यांची संपादणूक कमी आढळेल त्या घटकांचा पुनर्अध्यापन, सराव व उजळणी करून घ्यावी.

**इयत्ता : तिसरी** **प्रात्यक्षिक/तोंडी प्रश्न** **गुण – १०**

| अध्ययन निष्पत्ती क्र. | प्रात्यक्षिक/तोंडी प्रश्न व त्या अनुषंगाने शिक्षकांसाठी सूचना | विद्यार्थी | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | अ | ब | क | ड | इ |
| प्रा./तों. १) 2.71.01 | तोंडी बेरीज विचारावी. | १६ + ७ | ४ + २३ | ११ + ५ | २५ + ६ | ९० + ५ |
| प्रा./तों. २) 2.71.01 | तोंडी वजाबाकी विचारावी. | २४ − ४ | ३० − २२ | १५ − ० | ५१ − २ | १९ − १९ |
| प्रा./तों. ३) 2.71.01 | दोन अंकी संख्येतील दशक/एकक स्थानाची स्थानिक किंमत विचारावी. | ४८ | २३ | ५० | ९२ | ७२ |
| प्रा./तों. ४) 2.71.02 | भौमितिक आकार ओळखण्यास सांगावे. | दंडगोल | इष्टिकाचिती | शंकू | गोल | चौरस |
| प्रा./तों. ५) 2.71.08 | भारतीय वर्षाचा महिना सांगून त्याचा पुढील महिना विचारावा. | चैत्र | श्रावण | भाद्रपद | माघ | पौष |
| प्रा./तों. ६) 2.71.10 | मणीमाळेवर (शतक माळ) संख्या दाखवण्यास सांगावे. | ३ | ४४ | ३९ | ८१ | ९९ |
| प्रा./तों. ७) 2.71.01 | १०० रु. पर्यंत नाणी व नोटा वापरून रक्कम तयार करायला सांगावे. | २५ रु. | ९० रु. | १० रु. | ३८ रु. | ५० रु. |
| प्रा./तों. ८) 2.71.07 | वजनकाटा वापरून दिलेल्या कोणत्याही दोन वस्तूंची तुलना करून जड–हलका ओळखण्यास सांगावे. | कंपासपेटी व डस्टर | वॉटरबॅग व पुस्तक | वॉटरबॅग व वही | पुस्तक व वही | पट्टी व वर्तमानपत्र |
| प्रा./तों. ९) 2.71.06 | हाताची बोटे, वीत, पेन्सिल इ. अप्रमाणित लांबीच्या एककाच्या साहाय्याने वर्गातील उपलब्ध वस्तूंची लांबी मोजण्यास सांगावे. जसे : टेबलाची लांबी, फळ्याची लांबी इ. | | | | | |
| प्रा./तों. १०) 2.71.05 | उपलब्ध भांड्यात कपाने किती पाणी मावेल याचे प्रात्यक्षिक करायला सांगावे. जसे : बादली, वॉटरबॅग, तांब्या इत्यादी | | | | | |

**टीप : प्रात्यक्षिक चाचणीच्या सर्व प्रश्नांचे वाचन करून, त्यासाठी आवश्यक असणारे साहित्य चाचणी घेण्यापूर्वी पुरेशा प्रमाणात उपलब्ध करून ठेवावे. साहित्याचा वापर करूनच ही चाचणी घ्यावी.**

**इयत्ता : तिसरी** **उत्तरसूची : लेखी चाचणी**

<table>
<tr><th>प्रश्न क्र.</th><th>उत्तरे</th></tr>
<tr><td>१)</td><td>अ) सत्तेचाळीस<br>ब) पर्याय क्र. ४ : (२८)<br>क)
<table><tr><th>दशक</th><th>एकक</th></tr><tr><td>५</td><td>९</td></tr></table>
ड) पर्याय क्र. १ : (८० + २)<br>इ) ४३ > ३३<br>फ) ९६<br>ग) १२</td></tr>
<tr><td>२)</td><td>अ) ८७<br>ब) ५४<br>क) ३१<br>ड) ११<br>इ) ८०<br>फ) ४८<br>ग) पर्याय क्र. ४ : (४२)</td></tr>
<tr><td>३)</td><td>अ) पर्याय क्र. २ : (कलिंगड व पपई)<br>ब) ३४ रु. नाणी व नोटा मिळून ६० रुपये होणारे उत्तर ग्राह्य धरावे.<br>+ २६ रु.<br>६० रु.</td></tr>
<tr><td>४)</td><td>अ) काल - बुधवार, उद्या - शुक्रवार<br>ब) मे , जुलै</td></tr>
<tr><td>५)</td><td>अ) पर्याय क्र. ४ : त्रिकोण<br>ब) पर्याय क्र. ३ : C<br>क) आडव्या रेषा = ३</td></tr>
<tr><td>६)</td><td>पर्याय क्र. ४</td></tr>
<tr><td>७)</td><td>५, १०, <u>१५</u>, २०, <u>२५</u>, ३०, ३५, <u>४०</u>, <u>४५</u>, ५०.</td></tr>
<tr><td>८)</td><td>अ) मेथी<br>ब) ७</td></tr>
</table>